**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, मुक्काम पोस्ट - पारगांव तर्फे अवसरी ब्रुद्रुक., तालुका - आंबेगांव, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित १९.० मेगावॅट ते २९.० मेगावॅट सहविद्युत प्रकल्प विस्तारिकरणाच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

**संदर्भः-**

१) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार.

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश.

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश.

--------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, मुक्काम पोस्ट - पारगांव तर्फे अवसरी ब्रुद्रुक., तालुका - आंबेगांव, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित १९.० मेगावॅट ते २९.० मेगावॅट सहविद्युत प्रकल्प विस्तारिकरणाच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी वार - गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६८/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी – २०१११७-एफटीएस-००२३, दि.१७-११-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२ - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

श्री नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, मप्रनि मंडळ, पुणे तथा सदस्य, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Virtual Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या प्रत्येक सत्रात जास्तीतजास्त ८० व्यक्तींना मुखपट्टी (मास्क) व सामाजिक अंतर राखून बैठकीच्या जागी परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची/भाग घेऊ इच्छिणा-यांची संख्या जास्त असल्यास उरलेल्या व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात/ बैठकीच्या जागी प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

सदस्य, समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, मप्रनि मंडळ, पुणे तथा सदस्य, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व

मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री शिंदे यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, मुक्काम पोस्ट - पारगांव तर्फे अवसरी ब्रुद्रुक., तालुका - आंबेगांव, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित १९.० मेगावॅट ते २९.० मेगावॅट सहविद्युत प्रकल्प विस्तारिकरणाच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ब १ (ड) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

सदस्य, समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या राज्य पर्यावरण मुल्यांकन समितीची (SEAC-I) प्राथमिक मान्यता

(ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी अर्ज १६७ (अ) व्या राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती (SEAC-I) बैठकीत दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी मंजुर करण्यात आला आहे.

सदरहू जनसुनावणी ही दिनांक ०२-१२-२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात दिनांक ३१-१०-२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. मात्र पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक, २०२० आचारसंहिता लागू झाल्याने सदरहू पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली.

त्यानंतर माननीय जिल्हादंडाधिकारी, पुणे यांच्या पूर्व परवानगीने जनसुनावणी ही गुरुवार १०-१२-२०२० रोजी आयोजित करण्यात आली. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात दिनांक २७-११-२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - पुणे,जिल्हा-पुणे , मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे , तहसील कार्यालय-घोडेगाव, तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे, ग्रामपंचायत कार्यालय-पारगांव तर्फे अवसारी बु. तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, पर्यावरण

व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

सदस्य, समन्वयक यांनी उपस्थितांना सांगितले की त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात.

सदस्य, समन्वयक श्री शिंदे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित १९.० मेगावॅट ते २९.० मेगावॅट सहविद्युत प्रकल्प विस्तारिकरणासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी ४२ कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. पर्यावरण व्यवस्थापन योजनांसाठी रुपये 30 लाख एवढी रक्कम आरक्षित करण्यात आलेली आहे. प्रकल्पात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या निर्देशांनुसार ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित आहे. त्यांनी प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती दिली.

सादरीकरणानंतर सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**<u>खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरेः-</u>**

१) **<u>श्री बाळशिराम दगडू सोळसे, राहणार-ढाकाळे, तालुका-आंबेगांव,जिल्हा-पुणेः-</u>**

प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी सयंत्रणा आहे काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात ३४८.० घनमीटर प्रति दिन औद्योगिक सांडपाणी निर्मिती होईल. सदरहू सांडपाण्यात सेंद्रीय प्रमाण (Organic Load) जास्त नसतो. त्यात टीडीएसचे प्रमाण थोडे जास्त असते. प्रकल्पात आपण १३५०.० घनमीटर प्रतीदिन क्षमतेची औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तयार होणारे एकूण सांडपाणी हे ११६५.० घनमीटर एवढे तयार होईल. त्यामुळे प्रकल्पात कार्यरत असलेली औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा ही विस्तारित सहविद्युत प्रकल्पातील सांडपाणी प्रकिया करण्यास सक्षम आहे. त्यामुळे औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेची क्षमता वाढविण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पात कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (सीपीयु) सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. सीपीयुत प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे घटक हे नदीतील पाण्याच्या प्रमाणात असतात. सीपीयुत प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा उत्पादन प्रकियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे.

२) **<u>श्री प्रविण हौशीराम साबळे, राहणार - काठापूर बुद्रुक. तालुका-आंबेगांव,जिल्हा-पुणेः-</u>**

प्रकल्पात आपण नविन चिमणी कार्यान्वित करणार आहात का?

आपण नविन चिमणी कार्यान्वित करणार नाही. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आम्ही अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की ३७ टीपीएच चे ४५ टीपीएच बॉयलरचे आपण विस्तारिकरण करत आहोत. त्यास लागणारा बगॅस हा ३९ टन प्रती तास आहे. त्यास लागणा-या बगॅसमधील

सल्फरची टक्केवारी बघितली असता कार्यन्वित चिमणीची उंची पुरेशी असल्याने आपण चिमणीची उंची वाढवणार नाही.

३) **<u>श्री अजित दिनकर वाव्हळ, राहणार-शिंगवे पारगाव, तालुका-आंबेगांव, जिल्हा-पुणेः-</u>**

येथून चार कि.मी. अंतरावर राहतो. सह वीजनिर्मिती प्रकल्पात इंधन कुठले वापरणार आहात. ते इंधन आपणास पुरेल काय?

इंधन म्हणून कारखान्यात तयार होणारा बगॅस ज्यास आपण मराठीत चिपाड म्हणतो, तो आपण इंधन म्हणून वापरणार आहोत. आता कारखान्याची क्षमता ६,०००.० टन प्रति दिन आहे. त्याच्या ३०% आपण बगॅस धरला तर आपणास १८०० मेट्रीक टन बगॅस दररोज मिळतो. जर १८० दिवस कारखाना चालला, तर आपणास ३,२४,००० मेट्रीक टन एवढा बगॅस आपणास मिळतो. आपणास सहविद्युत प्रकल्प चालविण्यास तो पुरेसा आहे.

४) **श्री भरत सखाराम गटे, राहणार - गाव कुरवंडी, तालुका - आंबेगाव, जिल्हा-पुणे**

सदरहू प्रकल्प उभारणीस किती खर्च येणार आहे?

सदरहू प्रकल्पासाठी ४२.० कोटी खर्च येणार आहे.

५) **<u>श्री आगंद बाबुराव पोंदे, राहणार-पारगाव शिंगवे, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणेः-</u>**

चिमणीतून जो धुर निघणार आहे, त्या धुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत?

आपण इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर (ईएसपी) कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे सध्या ३७ टीपीएचचे दोन बॉयलर आहेत, त्याची क्षमतेमध्ये वाढ करून ४५ टीपीएच करणार असून त्यासाठी कार्यान्वीत असलेले वेट स्क्रबरची क्षमता ही वाढविण्यात येईल.

६) **<u>श्री दौलतराव लोखंडे, राहणार - पारगांव, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणेः-</u>**

सदरहू कारखाना केंद्र सरकारचे प्रदुषण नियंत्रणाचे सर्व नियम पाळणारा आहे. तरी हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर किती लोकांना रोजगार मिळेल याची माहिती द्यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की या विस्तारिकरणामुळे बांधकामाच्या टप्प्यात ५० व्यक्तींना रोजगार मिळेल. मात्र प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित होईल तेव्हा नविन तीस लोकांना रोजगार मिळू शकेल.

७) **<u>श्री उदय एकनाथ कोकणे, चिंचोली कोकणे,राहणार - चिंचोली कोकण्यांची, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणेः-</u>**

विस्तारिकरणासाठी नविन जमिन खरेदी करणार आहात काय?

कार्यरत प्रकल्पातच याठिकाणी बॉयलरचे विकसन (upgradation) करून आपण सहविद्युत प्रकल्पाचे विस्तारिकरण करणार आहोत.

येथे सदस्य, समन्वयक समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीच सांगितले की पर्यावरणविषयक जाहिर सूचना स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशिकत केल्यानंतर वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२ यांना एकही सूचना वा आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही. सदस्य, समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना त्यांच्या काही सूचना असल्यास त्या देण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण येथे भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेडच्या सहविद्युत प्रकल्प विस्तारिकरण १९.० मेगावॅट ते २९.० मेगावॅट प्रकल्पाच्या जनसुनावणीसाठी आपण जमलो आहोत. बैठकीत सांगितल्याप्रमाणे २ डिसेंबर, २०२० लाच ही जनसुनावणी

आयोजित करण्यात आलेली होती. पण पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीमुळे ती पुढे ढकलण्यात आली. कोविडची पार्श्वभूमी असूनही बरेच नागरिक जनसुनावणीस उपस्थित आहेत. हे सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढल्याचे निश्चितच लक्षण आहे. सादरीकरणानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, हरकती नोंदविण्याची संधि देण्यात आलेली होती. ब-याच उपस्थितांनी त्यांचे प्रश्न मांडले आहेत व त्याचे निराकरणही करण्यात आलेले आहे. जर नविन प्रकल्प असेल किंवा कार्यरत प्रकल्पाचे विस्तारीकरण असल्यास जनतेच्या सूचना, हरकतीसाठी जनसुनावणी घेऊन अहवाल शासनास पाठविण्यात येतो. येथेही उपस्थित करण्यात आलेल्या सर्व सूचना, हरकती यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की जरी सादरीकरणात २०१४ पासून केलेल्या सामाजीक उपक्रमांची माहिती दिलेली असली, तर सीईआर म्हणजे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी-Corporate Environment Responsibility Fund प्रकल्प प्रवर्तक कसा निधी खर्च करणार याबाबत काहीही माहिती सादरीकरणात नाही. तरी सीईआर बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी व संपूर्ण प्रकल्पाचा विचार करुन सीएसआर खर्च कसा करणार याबाबत माहिती द्‌यावी.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी चर्चेत सांगितल्याप्रमाणे ईएसपी - इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर आपण बसविला का याबाबत विचारणा केली व असल्यास तो सतत कार्यान्वित ठेवण्यात यावा अशी सूचना केली. त्यामुळे धुलीकणांचा अटकाव होऊन आपणास चांगले परिणाम दिसतील. अध्यक्षा यांनी सीईआर बाबत माहिती बैठकीत उपस्थितांना देण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की १ मे, २०१८ च्या पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्द्‌शांनुसार भांडवली खर्चाच्या १% सीईआर निधी राखाव ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक सामाजिक योजना मान्यतेसाठी जिल्हा प्रशासनास सर्व माहिती सादर करतील व मंजुरीनंतर त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, हरकती मांडण्याची सूचना केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्वांच्या सूचना, हरकती यांचे निरसन झाल्याचे दिसून येत आहे. त्यांनी बैठकीस स्थानिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सूचना, हरकती मांडल्याबद्दल, तसेच शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(नितीन शिंदे),**
सदस्य, समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२,
मप्रनि मंडळ, पुणे

**(डॉ. जयश्री कटारे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे,
जिल्हा - पुणे